RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

**वर्ष ५, अंक ७० (४)]** **शनिवार, जून १, २०१९/ज्येष्ठ ११, शके १९४१** **[पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००**

**असाधारण क्रमांक १७०**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ मे २०१९

**अधिसूचना**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क विनियमन) अधिनियम, २०१५.

क्रमांक संकीर्ण १५१७/प्र.क्र.२०/७ अे. —महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२८) याच्या कलम २३ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक पदवी तांत्रिक पाठयक्रमांना प्रवेश विनियमन) नियम, २०१८ खालीलप्रमाणे सुधारीत करीत आहे :—

१. या नियमांना महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक पदवी तांत्रिक पाठयक्रमांना प्रवेश विनियमन) (पहिली सुधारणा) नियम, २०१९ असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक पदवी तांत्रिक पाठयक्रमांना प्रवेश विनियमन) नियम, २०१८ (यानंतर यांचा उल्लेख "मुख्य नियम" असा करण्यात येईल.) मधील कलम ८ पोट-कलम (३), मधील " विविध महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी गुणानुक्रम देणे " या शब्दांनी सुरु होणारा आणि "गुणानुक्रम निश्चित करण्यात येईल" या शब्दांनी संपणारा भाग यामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे :—

"विविध महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी गुणानुक्रम देणे :—प्रवेश अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत उमेदवाराचे वय किमान १६ वर्षे असावे. तसेच पात्रता परीक्षेमध्ये (इ. १२ वी (विज्ञान)/तत्सम परीक्षा) खुल्या उमेदवारास किमान ५० टक्के गुण आणि आरक्षित प्रवर्गाच्या (अ.जा./अ.ज./वि.जा./भ.ज. (ब)/भ.ज. (क)/भ.ज. (ड)/इमाव/ विमाप्र/ सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्ग/आर्थिकदृष्टया दुर्बल घटक ) तसेच अपंग उमेदवारास किमान ४० टक्के गुण असावे. अशा उमेदवारांचा सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत घेण्यात आलेल्या संबंधित शैक्षणिक वर्षाच्या सामायिक प्रवेश परीक्षेमध्ये (MHT-CET/JEE/NEET/AIEEA-UG)

प्राप्त झालेल्या गुणांची टक्केवारी/गुणांचे परसेंटाईल तसेच सोबतच्या अनुसूची दोन प्रमाणे अधिभार यांच्या आधारावर पाठयक्रमांच्या प्रवेशासाठी गुणानुक्रम निश्चित करण्यात येईल.”

३. मुख्य नियमांमधील नियम १० मध्ये “परिशिष्ट-१ व परिशिष्ट-२ नुसार अवलंबिण्यात येईल” या शब्दांनी संपणाऱ्या भागापुढे, “आणि याबाबत वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय लागू होतील.” हा भाग समाविष्ट करण्यात येत आहे.

४. उक्त मुख्य नियमांमध्ये खालीलप्रमाणे अनुसूची-दोन समाविष्ट करण्यात येत आहे :—

**“ अनुसूची- दोन**

**कृषि विद्यापीठांतर्गत व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता अधिभार**

कृषि विद्यापीठांतर्गत बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषि), बी.एस्सी. (ऑनर्स) (उद्यानविद्या), बी.एस्सी.(ऑनर्स) (वनशास्त्र), बी. टेक. (कृषि अभियांत्रिकी), बी. टेक. (अन्नशास्त्र), बी.एस्सी. (ऑनर्स) (सामुदायिक विज्ञान), बी.टेक. (जैव तंत्रज्ञान) या पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता अधिभार खालीलप्रमाणे देय राहील. कोणत्याही परिस्थितीत खालीलपैकी एक किंवा अनेक अधिभार लागू करतांना २० टक्क्यांपेक्षा अधिकचा अधिभार अनुज्ञेय राहणार नाही.

| | | |
|---|---|---|
| १ | मत्स्यव्यवसाय करणाऱ्या कुटुंबातील किंवा शेती व्यवसाय करणाऱ्या कुटुंबातील उमेदवार, ज्यांची स्वत:ची अथवा त्यांचे आई-वडील/आजी-आजोबांच्या (वडीलांकडून) नावे शेतजमीन असल्याबाबत ७/१२ चा उतारा किंवा भूमिहीन शेतमजूर किंवा शेतकरी असल्याबाबतचे बंदर अधिकारी/तहसीलदार/नायब तहसीलदार यांचे प्रमाणपत्र | १२ टक्के |
| २ | राष्ट्रीय छात्रसेना “बी” “सी” प्रमाणपत्र/हवाईदल/ सेना/ नौदल विभागाचे प्रमाणपत्र/राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये किमान २४० तास काम केलेले/विशेष शिबीर केलेले प्रमाणपत्रधारक | २ टक्के |
| ३ | जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धांमध्ये सहभाग घेतल्याचे प्रमाणपत्रधारक | २ टक्के |
| ४ | महाराष्ट्र राज्य कृषि विद्यापीठांच्या आस्थापनेवरील किंवा कृषि परिषद, पुणे/महाराष्ट्र राज्यातील कृषि विद्यापीठांमध्ये प्रतिनियुक्तीवर काम केलेले आजी व माजी कर्मचारी यांचे पाल्य | ३ टक्के |
| ५ | वादविवाद, निबंध स्पर्धा, वक्तृत्व या राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये भाग घेतला असल्याबाबतचे प्रमाणपत्र | २ टक्के |
| ६ | खालील व्यावसायिक/ऐच्छिक विषय/पदविकासह उमेदवार उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (१० + २ परीक्षा पध्दती) उत्तीर्ण झालेला असल्यास, खालीलप्रमाणे १० टक्के प्रती विषय याप्रमाणे अधिभार लागू होईल. | |
| | **(क) बी.एस्सी (ऑनर्स)(कृषि)** | **सांकेतांक** |
| | १) पशुविज्ञान व दुग्धव्यवसाय | बी-२ |
| | २) पीकशास्त्र | बी-४ |
| | ३) उद्यानविद्या | बी-५ |
| | ४) पीक उत्पादन/कृषि विज्ञान व तंत्रज्ञान | ७५ |
| | ५) पशुविज्ञान/पशुविज्ञान आणि तंत्रज्ञान | ७६ |
| | ६) ग्रामीण कृषि विज्ञान संस्था अमरावती व वर्धा येथील पदविका | बी-१ |
| | ७) कृषि शाळा पदविका (१२ वी परीक्षा पास झालेले) | डी-२ |
| | **(ख) बी.एस्सी (ऑनर्स) (उद्यानविद्या) आणि बी.एस्सी (ऑनर्स) (वनशास्त्र)** | |
| | १) पीकशास्त्र | बी-४ |
| | २) उद्यानविद्या | बी-५ |
| | ३) पीक उत्पादन/कृषि विज्ञान व तंत्रज्ञान | ७५ |
| | ४) ग्रामीण कृषि विज्ञान संस्था अमरावती व वर्धा येथील पदविका | बी-१ |
| | ५) कृषि शाळा पदविका (१२ वी परीक्षा पास झालेले) | डी-२ |

| | | |
|---|---|---|
| | (ग) बी.टेक (कृषि अभियांत्रिकी) | |
| | १) विद्युत परिरक्षण | अे-१ |
| | २) यांत्रिकी परिरक्षण | अे-२ |
| | ३) सर्वसाधारण स्थापत्य अभियांत्रिकी | अे-४ |
| | ४) कृषि यांत्रिकी | बी-३ |
| | ५) इलेक्ट्रॉनिक्स | सी-२ |
| | (घ) बी.टेक (अन्नशास्त्र) | |
| | १) बेकरी व मिठाई | बी-७ |
| | २) अन्न साठविण्याची प्रक्रिया | बी-८ |
| | ३) मत्स्य प्रक्रिया तंत्रज्ञान | बी-९ |
| | (च) १) बी.एस्सी. (ऑनर्स) (सामुदायिक विज्ञान) | |
| | १) पाककला | बी-६ |
| | २) बेकरी व मिठाई | बी-७ |
| | ३) अन्न साठविण्याची प्रक्रिया | बी-८ |
| | ४) क्रच ॲण्ड प्री स्कूल मॅनेजमेंट | क्यु-१/२/३ |
| | (छ) बी. टेक. (जैव तंत्रज्ञान) | |
| | १) पीक उत्पादन/कृषि विज्ञान व तंत्रज्ञान | ७५ |
| | २) पशु विज्ञान/पशु विज्ञान आणि तंत्रज्ञान | ७६ |
| | ३) पशु विज्ञान आणि दुग्ध व्यवसाय | बी-२ |
| | ४) शेतीयंत्र/अवजारे | बी-३ |
| | ५) पीकशास्त्र | बी-४ |
| | ६) उद्यानविद्या | बी-५.” |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**सु. स. धपाटे,**
शासनाचे उप सचिव.

**AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 31st May 2019.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF ADMISSIONS AND FEES) ACT, 2015.

No. Sankirna 1517/C.R.20/7A.—In exercise of the powers conferred by section 23 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015 (Mah. XXVIII of 2015), the Government of Maharashtra hereby makes the following rules to amend the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions to the Full Time Professional Degree Technical Courses) Rules, 2018, as follows namely :—

1. These rules may be called the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions to the Full Time Professional Degree Technical Courses) (First Amendment) Rules, 2019.

2. In rule 8 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions to the Full Time Professional Degree Technical Courses) Rules, 2018 (hereinafter referred as "the principal Rules"), in sub-rule (3), for the portion beginning with the words "Assignment of Merit "and ending with the words "of MCAER Pune", the following shall be substituted, namely :—

"Assignment of Merit Number for Admission in Various Colleges.—The candidates having a minimum age of 16 years up to the last date of submission of admission form and the candidates securing minimum 50% marks for open category and 40% marks for reserved candidates (SC / ST /VJ (a) / NT (b) / NT(c) / NT (d) / OBC / SBC /Socially and Educationally Backward Classes/Economically Backward Class) and physically handicapped candidates in [12th std (Science) /equivalent examination]. The merit number of such candidates for various courses shall be decided by percentage/percentile obtained in CET (MH-CET/ JEE/ NEET/ AIEEA-UG) of concerned academic year and weightages as per schedule – II.

3. In rule 10 of the Principal Rules, after the words and figures "Appendix I and Appendix II", the following shall be added, namely :—

"and subsequent Government Resolutions issued, in this regard from time to time."

4. After Schedule – I appended to the principal Rules, the following Schedule shall be added, namely :—

"*Schedule – II*

**The weightages for the admission of professional degrees courses under Agriculture Universities**

The weightages for the admission of B.Sc. (Agri.) (Honours) , B.Sc. (Honours) (Hort.) & B.Sc. (Honours) (Forestry) , B.Tech.(Agri.Engg.), B.Tech.(Food Technology), B.Sc. (Hons.) (Community Science) and B.Tech. (Biotech) these degree courses under Agriculture Universities are as follows. In any condition maximum limit of weightages shall not be more than 20 points.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Those who hail from Fisherman's family or those who hail from Agriculturist's family having land in his/her name or in the name of parents/grand parents (Paternal) as evidenced by 7/12 certificates or Land-less Agricultural Labour or Agriculturist Certificate issued by the Port Officer / Tahsildar / Naib Tahsildar | | 12 per cent |
| 2 | Those who hold NCC 'B' or 'C' certificate/Air/Army/Naval wings /N.S.S. for at least 240 hrs / Special Camp. | | 2 per cent |
| 3 | Those who hold certificate of participation in District, State, National, International level tournaments / competition in games and sports etc. | | 2 per cent |
| 4 | Those whose parents are/were the employees are on establishment of the Maharashtra Agricultural Universities and on deputation to Agricultural Universities in Maharashtra or MCAER. | | 3 per cent |
| 5 | Certificate of Debate/Essay/ Elocution Competition of State Level Competition issued by the concerned Organization. | | 2 per cent |
| 6 | Those who have passed Higher Secondary School Certificate Examination [under 10+2 pattern] with the following vocational / optional subjects / diploma. (10 per cent per subject) | | Code |
| | **(a)** | **B.Sc. (Agri.) (Honours)** | |
| | | Animal Science & Dairying | B2 |
| | | 1. Crop Science | B4 |
| | | 2. Horticulture | B5 |
| | | 3. Crop Production/Agri.Science & Tech. | 75 |
| | | 4. Animal Science/Animal Sci. & Tech. | 76 |
| | | 5. Diploma in Agril. Science of Rural Institute,Amravati and Wardha. | B-1 |
| | | 6. Diploma in Agriculture School [Those who have passed XII Std.(Science) examination] | D-2 |
| | **(b)** | **B.Sc. (Honours) (Hort.) & B.Sc. (Honours) (Forestry)** | |
| | | 1. Crop Science | B-4 |
| | | 2. Horticulture | B-5 |
| | | 3. Crop Production / Agriculture Science & Technology | 75 |
| | | 4. Diploma in Agril. Science of Rural Institute, Amravati or Wardha. | B-1 |
| | | 5. Diploma in Agriculture School [Those who have passed XII Std. (Science) examination] | D-2 |

| | | | |
|---|---|---|---|
| | **(c)** | **B.Tech.(Agri.Engg.)** | |
| | | 1. Electrical Maintenance. | A-1 |
| | | 2. Mechanical Maintenance. | A-2 |
| | | 3. General Civil Engineering | A-4 |
| | | 4. Farm Mechanics | B-3 |
| | | 5. Electronics | C-2 |
| | **(d)** | **B.Tech.(Food Technology)** | |
| | | 1. Bakery and Confectionary | B-7 |
| | | 2. Food Preservation | B-8 |
| | | 3. Fish Processing Technology | B-9 |
| | **(e)** | **B.Sc. (Hons.) (Community Science)** | |
| | | 1. Cookery | B-6 |
| | | 2. Bakery and Confectionary | B-7 |
| | | 3. Food and Preservation. | B-8 |
| | | 4. Creche & Pre-School Management | Q-1/2/3 |
| | **(f)** | **B.Tech. (Biotech)** | |
| | | 1. Crop Production | 75 |
| | | 2. Animal Science / Animal Science & Technology | 76 |
| | | 3. Animal Science and Dairying | B-2 |
| | | 4. Farm Mechanics | B-3 |
| | | 5. Crop Science | B-4 |
| | | 6. Horticulture | B-5.” |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. S. DHAPATE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.